## <u>रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक १२४/२०१५ मधील नि.क्र.६४ वरील आदेश</u>

वादी यांनी मुळ दावा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी दुरुस्तीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये 'शेतजमीन' या शब्दाऐवजी 'विहीरपड' असा शब्द टंकलेखनाच्या चुकीमूळे नमुद करणेत आलेला आहे. परंतु तो प्रत्यक्षात 'शेतजमीन' असा आहे. त्यामुळे सदरचा टंकलेखनाच्या चुकीमूळे झालेला दोष दावा दुरुस्तीद्वारे दुर करुन मिळावा अशी मागणी वादी यांनी केली आहे.

प्रस्तुत केसमधील मयत आक्काताई यांच्या नावाखाली प्रतिवादी क्र.६ कृष्णा तातोबा सुतार यांच्या नावाची देखील दुरुस्ती दाव्यामध्ये करण्याची मागणी वादी यांनी केली आहे.

२. सदरहू अर्जाला अनुषंगुन प्रतिवादी क्र.५/१ ते ५/६ यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे त्याच अर्जावर सादर केले आहे. त्यांनी वादी यांचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

३. वादी–प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन पुढील विवाद मुद्दा माझेसमोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे –

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो काय? | ..होकारार्थी |
| २ | कोणता आदेश ? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुददा क्रमांक १ बाबत</u> –**

४. वादी यांनी मुळ दावा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये 'शेतजमीन' या शब्दाऐवजी 'विहीरपड' असा शब्द टंकलेखनाच्या चुकीमूळे नमुद करणेत आलेला आहे. परंतु तो प्रत्यक्षात 'शेतजमीन' असा आहे. त्यामुळे सदरचा टंकलेखनाच्या चुकीमूळे झालेला दोष दावा दुरुस्तीद्वारे दुर करुन मिळावा अशी मागणी वादी

यांनी केली आहे. निर्विवादपणे सदरची मागणी ही अत्यंत तांत्रीक स्वरुपाची आहे. व स्पष्टपणे सदरची चूक ही टंकलेखनाच्या चुकीमूळे झाल्याचे अभिप्रेत होते. तसेच मयत आक्काताई यांना कृष्णा तातोबा सुतार हे वारस असल्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता सर्व आवश्यक पक्षकार केसचेकामी पक्षकार करणे गरजेचे असल्यामुळे ती दावा दुरुस्ती देखील करणे अपरिहार्य बाब आहे. त्यामुळे तो दोष दुरुस्त करुन दिला नाही तर दावा गुणदोषावर निकाली होण्यास अडचण निर्माण होईल.

६. त्यामुळे जर वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादी यांना त्यांना अतिरिक्त कैफियत देणेची संधी उपलब्ध राहणार असल्यामुळे दावा सुलभतेने चालण्याच्या दृष्टीने वादींचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुददा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. वादी यांचा नि.क्र.६४ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पंधरा दिवसांमध्ये दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत केसकामी सादर करावी.

३. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

(न्यायालयासमोर घोषित केले.)

सही/–

ठिकाण – मिरज (अभय अ. मेहेंदळे)

दिनांक – ०७.०६.२०१८ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.